# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिति *
## कार्यपत्रिका क्रमांक २

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरूवार दि. १६/४/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. २५**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/३/२०२० ते दि.२५/३/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/६२७५ दि. २७/३/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २६**

मा. दिलीप वेडेपाटील यांचे दि. ८/४/२०२० चे पत्र.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निवडणुक आचारसंहिता, स्वच्छ सर्व्हेक्षणाची कामे व कोरोना सारखा संसर्गजन्य आजार या बाबीमुळे ३ महिने कामकाज सुरळीत व वेळेत न झाल्याने या आर्थिक वर्षातील विकासकामांना ज्या कामाच्या निविदा प्रक्रिया झालेल्या आहेत अशा विकासकामांना मुदतवाढ मिळावी. कोरोना मुळे जी राष्ट्रीय आपत्ती देशभर निर्माण झालेली आहे ती विचारात घेवून ज्याप्रमाणे देशातील सर्वोच्य आर्थिक संस्था म्हणजेच भारतीय रिझर्व्ह बँकेने ज्या प्रकारे आर्थिक वर्ष २०१९-२०२० साठी मुदतवाढ दिलेली आहे. त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेने सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात ज्या विविध कामांच्या निविदा यापुर्वीच मागविलेल्या आहेत अशा सर्वच निविदांना मान्यतेसाठी व कामाची बिले खर्ची टाकण्यासाठी कोरोना बाबतचे राष्ट्रीय व राज्य सरकारच्या पातळीवर जो निर्बंध घालण्यात आलेले आहेत ते पुर्णत: उठलेल्या नंतर त्या दिनांकाच्या पुढे ०३ महिन्यांचे करिता मुदतवाढ देण्यात यावी.

**विषय क्र. २७**

मा. आबा बागुल यांचे दि.८/४/२०२० चे पत्र.

जगभरात कोरोना विषाणूचे संकट आले असून या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र, राज्य शासन तसेच महानगरपालिकेच्या माध्यमातून योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. पंतप्रधानांनी २१ दिवस लॉकडाऊन करून नागरिकांना घरातून बाहेर न येण्याचे आवाहन केले आहे. कोरोना संशयित व कोरोना बाधित नागरिकांवर उपचार सुरू आहेत. सर्व आपत्कालीन व्यवस्थेमधील कर्मचारी आपल्या जीवाची व कुटूंबाची काळजी न करता आपले कर्तव्य पार पाडत आहेत. कोरोना विषाणूशी लढा देत आहेत. यामध्ये महानगरपालिकेचे अधिकारी, डॉक्टर, नर्स, सफाई कामगार व इतर सेवक यांचा सहभाग लाख मोलाचा असून आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठतेने प्रामाणिकपणे आपली सेवा करत आहेत. अशा कर्तव्य दक्ष सेवकांची काळजी घेणे ही देखील पुणे महानगरपालिका व आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

कोरोनाशी सुरू असलेल्या या लढ्यात काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी, डॉक्टर, नर्स, सफाई कामगार यांच्या आरोग्याची काळजी घेणे पुणे महानगरपालिकेची जबाबदारी असून त्यांच्या कुटुंबाची काळजी घेणे देखील आपले काम आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचा प्रत्येकी २५ लाख रूपयांचा एक वर्षाचा विमा पुणे महानगरपालिकेने काढून त्याचा एक वर्षाकरीता येणारा प्रीमियम भरावा. त्यामुळे कोरोना विषाणूच्या लढाईत कर्मचाऱ्यांवर कोणते संकट आल्यास सामोरे जाण्यास हे कर्मचारी आणखी खंबीरपणे उभे राहतील असा विश्वास वाटतो. यासाठी आपण लवकरात लवकर पावले उचलून या कर्मचाऱ्यांचा एक वर्ष मुदतीचा विमा काढावा.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. २८**

पुणे मनपाच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत निर्माण होणारा घनकचरा एकत्रित करून कॉम्पॅक्टरच्या ( १४ क्यु. मी. क्षमतेच्या सहाय्याने वाहतुक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि., मुबंई यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ९९,९७,७८७=२७ पेक्षा ४.८८% जादा) असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी आणि त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा.आयुक्त ( वि ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/०२ दि. १/४/२०२० चे पत्र.

१) सदर कामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि., मुंबई यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पुर्वगणनपत्रक रकमेपेक्षा ४.८८% ने जादा दराने ) र. रू. १,०४,८५,६७९=२९ ( अक्षरी र. रू. एक कोटी चार लाख पंच्याऐंशी हजार सहाशे एकोणाऐंशी पैसे एकोणतीस फक्त ) पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार काम करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस,

२) सदर कामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि., मुंबई यांचेकडून निविदा उघडल्याचे दिनांकानंतर स्वच्छ सर्वेक्षण २०२० चे साठी दि. ७/१/२०२० पासून विविध क्षेत्रीय कार्यालयाचे मागणीनुसार आवश्यकतेप्रमाणे भाडेतत्वावर कॉम्पॅक्टर वाहने घेण्यात येऊन क्षेत्रीय कार्यालयांना पुरवून कचरा वाहतूकीचे काम सुरू करण्यात आलेले असल्याने मान्यता पुर्वी केलेल्या कामाची पश्चात मान्यता मिळणेस,

**विषय क्र. २९**

प्रभाग क्र. ४१ कोंढवा बु. शिवशंभोनगर, काकडेवस्ती, नेहा क्लासिक येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. हरिशचंद्र रंगनाथ अनारसे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ३०,४२,८२२/- पेक्षा १७.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २५,०४,२४२=५० व अधिक जी. एस. टी. र. रू. ३,००,५०९=१० अधिक कन्सलटंसी चार्जेस र. रू. ३०,४२८=२२ अधिक टेस्टिंग चार्जेस र. रू. ४,२००/- अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू. ५७,३८४=०४ एकुण र.रु. २८,९६,७६३=८६ व विशेष भाववाढ ( स्टार रेट ) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/०३ दि.१/४/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३०**

मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.विरोधी पक्षनेते, मा.गटनेते, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, मा.गटनेते, शिवसेना, मा.गटनेते म.न.से. तसेच मा.स्थायी समिती सभा व मुख्य सभा (अंदाजपत्रकीय खास सभा) सभाप्रसंगी मागविणेत आलेल्या चहापान व खाद्यपदार्थ यांची बिले खर्ची टाकून संबंधितांस अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/नगरसचिव/०४ दि.७/४/२०२० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**